दैनिक आपल्या लोकांचा

# सत्यवादी

संपादक : शेख रेहान www.esatyawadi.com मो. 9822728340









करीश्मा कपूर अनेकदा तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत असते. तिचा एक्स पती संजय कपूरचे निधन झाल्यानंतर ती मोठ्या चर्चेत आली होती. त्यानंतर जेव्हा संजय कपूरच्या संपत्तीचा वाद निर्माण झाला, तेव्हाही ती व तिची मुले चर्चांचा भाग झाली होती. आता मात्र, करीश्माचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये करीश्मा पापाराझींबरोबर बोलत असल्याचे दिसते. ती त्यांना शांतपणे म्हणते, ''चेहऱ्यावर जास्त झूम करू नका'', त्यानंतर ती हसताना दिसते. तिथे गीता कपूर व इतर कलाकारही दिसत आहे.

# तुकाराम मुंढेंनी मोर्चा भेसळयुक्त सोयाबीन तेलाकडे वळवला!



## ▶ बीडच्या अन्न प्रशासनाने एकदाच कारवाई केली त्याच काय झालं?

## ▶ पुन्हा एकदा बीडची एमआयडीसी अन् मोंढा चाळण्याची गरज

### अकोल्यात मोठी कारवाई

**बीड । सत्यवादी**

तुकाराम मुंढे यांच्यामुळे राज्यात भेसखोरांची झोप उडाली असून, आतापर्यंत त्यांनी औषध कंपन्या, हॉटेल, दुग्ध पदार्थ बाबतीत कारवाया करुन सरळ केला. आता त्यांचा मोर्चा भेसळयुक्त सोयाबीन तेलाकडे वळला आहे. आकोल्यात रविवारी (दि.३०) मोठी कारवाई करुन हजारो लिटर तेल जप्त केले आहे. यामुळे राज्यभरात खाद्यतेलात भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अशीच एक कारवाई काही दिवसांपूर्वी बीडच्या अन्न व औषध प्रशासनाने केली होती. लाखो लिटर तेल जप्त केले होते. काही ठिकाणी सील लावले होते. पण त्या कारवायात पुढे काय झालं? पुलाखालून किती तेल वाहून गेले? हे काही अजून समजलं नाही. यामुळे एक कारवाई करुन झोपेच सोंग घेत असलेल्या बीडच्या अन्न व औषध

(पान २ वर...)

### ते ब्रॅण्ड बाजारात

ज्यांच्यावर कारवाई करुन तेल साठा जप्त करुन सील लावण्यात आले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी तेल पॅकिंग करुन विक्री सुरु झाली. सध्याही सुरु असल्याची चर्चा आहे. यामुळे त्यांना क्लिनचीट मिळाली आहे का? याचा खुलासा बीडच्या अन्न व औषध प्रशासनाने करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

## दुनियादारी

### अज्ञात मृतदेह दफण करणे सुरू, शेकडो कबरी तयार

**काठमांडू..**

नेपाळमध्ये भीषण पूर आल्यानंतर अज्ञात मृतदेहांचे सामूहिक दफन सुरू करण्यात आले आहे. चितवनमधील देवघाट जंगलात प्रशासनाने शेकडो कबरी खोदल्या आहेत. येथे अशा मृतदेहांना दफन केले जात आहे, ज्यांची ओळख पटलेली नाही आणि जे जास्त वेळ झाल्यामुळे खराब होऊ लागले आहेत. गेल्या दोन दिवसांत १९६ मृतदेह दफन करण्यात आले आहेत. अधिकाऱ्यांच्या मते, अनेक मृतदेह इतक्या वाईट अवस्थेत सापडले आहेत की त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. म्हणून, प्रत्येक मृतदेहासोबत ओळख क्रमांक आणि आवश्यक नोंदी ठेवल्या जात आहेत, जेणेकरून भविष्यात डीएनए चाचणीद्वारे त्यांची ओळख पटवता येईल. या दुर्घटनेतील ३ हजारांहून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. त्यांचे कुटुंबीय आपल्या प्रियजनांच्या शोधात आहेत.

### महाजन, मुंडे, खडसेंनी भाजपला रुजवले-पवार

**भुसावळ...**

जनसंघ व भाजपचे स्थान महाराष्ट्रात मर्यादित होते; पण प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आणि एकनाथ खडसे यांनी पक्षाचे स्थान जनतेत रुजवले, पक्ष तळागाळापर्यंत पोचवला. मात्र भाजपने त्यांच्यावर अन्याय केला. विधानसभेत शेतकऱ्यांचे दुखणे मांडायचे असेल तर एकनाथ खडसेंना सोबत घ्यायला पाहिजे, हा निर्णय आम्ही घेतला, असे मत राष्ट्रवादी श. प पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी एकनाथ खडसे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त रविवारी कोथळी येथील मुक्ताई मंदिराच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.

# शफीकभाऊ यांच्या मातोश्री शेख जाहेदाबी यांचे निधन



**बीड । सत्यवादी**

येथील एमआयएमचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. शेख शफीकभाऊ यांच्या मातोश्री शेख जाहेदाबी (बाजी) सालेह मोहम्मद यांचे रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी निधन झाले. मृत्युसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या, बीड शहरातील काकू-नाना हॉस्पीटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. रविवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६

रोजी रात्री ११. वा. तकिया मस्जिद परिसरातील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफनविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील व्यक्ती आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेख कुटुंबियांच्या दुःखात दैनिक सत्यवादी परिवार सहभागी आहे.

# ट्रम्पची खुमखुमी संपेना!

## होर्मुझमध्ये पुन्हा हल्ला; सैनिकांसह नागरिक ठार

**तेहरान । वृत्तसेवा**

अमेरिकन सैन्याने रविवारी इराणच्या लारक बेटावरील दोन रॉकेट लाँचर्सना लक्ष्य केले. ३० जुलैनंतर इराणवरील हा पहिला अमेरिकन हल्ला आहे. अमेरिकन सैन्याने सांगितले की, इराणचे रिव्होल्यूशनरी गार्ड्सचे जवान होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये रॉकेट आणि सागरी सुरुंग लाँच करण्याच्या तयारीत होते, तेव्हा ही कारवाई करण्यात आली.



इराणच्या निम-सरकारी माध्यमांनी लारक बेटाजवळ झालेल्या स्फोटांची पुष्टी केली आहे. इराणी माध्यमांनुसार, अमेरिकेने बेटावर ड्रोनने हल्ला केला. तर, इराणी सैन्याने सांगितले की, या हल्ल्यात त्यांचे अनेक सैनिक आणि

(पान २ वर...)

## विद्यार्थ्यांना हक्काच्या प्रवर्गातून ओपनमध्ये ढकलले

# एमबीबीएस-बीडीएस प्रवेशात आरक्षणाचा गोंधळ



### वैद्यकीय प्रवेशाच्या गुणवत्ता यादीत आरक्षणावर सीईटी सेलचा डल्ला

**संभाजीनगर । सत्यवादी**

एकीकडे मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी राज्यभरात रान पेटवले, तर दुसरीकडे ज्यांना आधीपासूनचे घटनादत्त आरक्षण आहे, अशा विद्यार्थ्यांचे आरक्षण सीईटी सेलने परस्पर संपुष्टात आणले. सीईटी सेलने एमबीबीएस, बीडीएस या (ग्रूप-ए) वैद्यकीय प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी २८ ऑगस्टला प्रसिद्ध केली.

धक्कादायक म्हणजे जालन्याच्या (ता. बदनापूर) आदित्य हरी कोल्हे या विद्यार्थ्याला तात्पुरत्या गुणवत्ता यादीत 'एनटी-सी'साठी पात्र ठरवले. नंतर लगेच 'ओबीसी' नव्हे थेट 'ओपन' गटात टाकले. यश खारुळे हा 'एससी' विद्यार्थी. त्यालाही 'ओपन' केले. संभाजीनगरच्या शिवाजीनगरातील नित्या ठेंगरे या विद्यार्थिनीला तर ओएमएससी अर्थात आऊटसाइड महाराष्ट्र स्टेट कँडिडेट घोषित केले. त्यामुळे ३० ऑगस्टला जाहीर झालेल्या यादीत तिघांही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागले. छत्रपती संभाजीनगरात असे शेकडो विद्यार्थी आहेत.

आदित्य कोल्हेच्या 'एनटी-सी' कॅटेगरीतील रँक १,३९,०८८ आहे. या रँकवर बीडीएसमध्ये चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश नक्की होणार होता. मात्र त्याला थेट 'ओपन' केल्यामुळे त्याचा ऑल इंडिया रँक २,९७,१०३ झाला. त्यामुळे त्याचा पहिल्या यादीत प्रवेश होऊ शकला नाही. आदित्य पूर्णपणे हताश झाला. तो म्हणाला, ' सीईटी सेलने माझ्या भवितव्याशी खेळ केला.

(पान २ वर...)

### चेक करून सांगावे लागेल

रविवारी सुटी असल्यामुळे सोमवारी मला यादी बघून केस टू केस पाहावे लागेल. नेमके त्यांना का ओपन केले., याची कारणे शोधावी लागतील. विद्यार्थ्यांनी तक्रार केली तर आम्ही चेक करू.

**-विनोद मळाले,** जनसंपर्क अधिकारी, सीईटी सेल

### शासनाकडूनच स्वत:चे निर्णय पायदळी

२ जुलै २०२६ च्या शासननिर्णयानुसार 'व्हॅलिडिटी'ला ६ महिने मुदत आहे. तोपर्यंत अर्जाची पावती जोडणे क्रमप्राप्त असते. तरीही 'ओपन' कॅटेगरीत टाकले. सीईटी सेलने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केला आहे.

**-सावनकुमार चुडिवाल,** अभ्यासक

# जरांगेंच्या विरोधानंतरही परभणीत मेळावा, मुंबईला जाणारच-जरांगे

**परभणी । सत्यवादी**

मराठा समाजाला दिले जाणारे आरक्षण हे कायद्याच्या चौकटीत टिकणारे असावे, ही सरकारची भूमिका आहे. घाईत कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. मराठा आरक्षण देताना इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणी येथील मेळाव्यात दिली.

(पान २ वर...)



# पक्षाच्या बैठकीला रोहीत पवारांची दांडी

## या वयात अस्वस्थपणा असतो, हळूहळू मॅच्युरिटी वाढते-खा.सुळे

**मुंबई । सत्यवादी**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चाही मागील काही महिन्यांपासून सुरू आहेत. असं असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांची काँग्रेस पक्षाशी वाढत असलेली जवळीक राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मुंबईत शनिवारी कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीला आमदार रोहित पवार यांनी दांडी मारल्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. मागील

(पान २ वर...)





# नगर-बीड डेमूचा प्रवास आता अधिक सुसाट

## प्रवाशांचे पावणे दोन तास वाचणार;खा.सोनवणेंची माहिती



**बीड । सत्यवादी**

अहिल्यानगर ते बीड या महत्त्वाच्या मार्गावर धावणाऱ्या डेमू ट्रेनच्या वेगात लक्षणीय वाढ करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून, गाड्यांचे सुधारित वेळापत्रकही अधिकृतपणे अधिसूचित करण्यात आले आहे. या नव्या निर्णयामुळे दोन्ही शहरांमधील प्रवासाचा वेळ तब्बल १ तास ३५ मिनिटांनी कमी झाला असून, आता हा पूर्ण प्रवास अवघ्या ४ तासांत पार पडणार आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी या संदर्भातील माहिती प्रसिद्धीस दिली आहे.

पुणे विभाग मध्य रेल्वेचे सुधारित वेळापत्रक १ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या सर्व प्रवासांसाठी लागू केले जाणार आहे. अहिल्यानगर आणि बीड या दोन शहरांदरम्यान प्रवाशांची सोय वाढवणे, तसेच त्यांना अधिक जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देणे हा या वेगवाढीमागील मुख्य उद्देश आहे. गाड्यांचा वेग वाढल्यामुळे दैनंदिन नोकरदार, व्यावसायिक, विद्यार्थी आणि

(पान २ वर...)

# वाढदिवसाला माजलगावात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

### पोलिसांची कारवाई

**माजलगाव । सत्यवादी**

माजलगाव शहरातील बसस्थानकासमोर वाढदिवसानिमित्त एका ३० वर्षीय इसमाने सार्वजनिक रस्त्यावर केलेल्या कृत्यामुळे परिसरात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या प्रकाराचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होऊन चर्चेत आल्यानंतर माजलगाव शहर पोलिसांनी तत्काळ दखल घेत संबंधित इसमास ताब्यात घेऊन समज दिली.

संबंधित इसम हा माजलगाव शहरातील इंद्रानगर परिसरातील रहिवासी आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना भीती वाटेल किंवा सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होईल, अशा पद्धतीने केलेल्या कृत्याबाबत पोलिसांनी त्याला कायदेशीर परिणामांची जाणीव करून दिली. संबंधित इसमाने पोलिसांसमोर माफी मागितली असून, भविष्यात अशा प्रकारचे कृत्य न करण्याचे त्याने मान्य केले आहे.

सार्वजनिक रस्ते, चौक, बसस्थानक परिसर अथवा अन्य सार्वजनिक ठिकाणी वाढदिवस किंवा इतर कोणत्याही कारणासाठी नागरिकांमध्ये भीती

(पान २ वर...)

# समग्र शिक्षा अभियान

शाळा विद्यार्थ्यांना आकर्षक वाटावी, या उद्देशाने सर्व शिक्षा अभियानात नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांना नवा चेहरा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून पारंपरिक चौकोनी आकाराच्या वर्गखोल्यांऐवजी षटकोनी वर्गखोल्यांची संकल्पना प्रत्यक्षात आली. मात्र, आज हीच रचना गळतीचे कारण ठरत असल्याकडे काही शिक्षक लक्ष वेधतात. जुनाट षटकोनी आकारातील बहुसंख्य वर्गखोल्यांमध्ये पावसाळ्यात गळतीची समस्या निर्माण होते. नाशिक जिल्हा परिषदेच्या साडेतीन हजार शाळांमध्ये अडीच लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. निम्म्याहून अधिक शाळांमध्ये षटकोनी वर्गखोल्या असल्याचे शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील अन्य भागांतही यापेक्षा वेगळी स्थिती नसल्याचे ते सांगतात.

बांधकामाच्या वेळी षटकोनी वर्गखोल्यांचे अनेक फायदे सांगण्यात आले होते. कमी जागेत दोन वर्गखोल्या आणि मुख्याध्यापकांची खोली बसवता येते. विविध बाजूंना खिडक्या असल्याने वर्गखोल्यांमध्ये नैसर्गिक प्रकाश आणि हवा मुबलक राहते. मात्र, पावसाळ्यात वर्गात जलधारा बरसत असल्याने विद्यार्थ्यांना नीट बसता येत नाही. परिणामी, शाळेचे दैनंदिन कामकाज चालवणेही कठीण होते. स्वमालकीच्या ६,४४१ इमारतीत १२ हजार ४२२ वर्गखोल्या आहेत. ३१ शाळा भाडेतत्त्वावरील तर २८ मोफत स्वरूपातील इमारतीत आणि तीन देऊळ वा चावडीवर भरतात. वर्गखोल्यांप्रमाणेच शौचालयांची अवस्थाही चिंताजनक आहे.

जिल्ह्यातील ४० शाळांमध्ये मुलींसाठी शौचालयच नाही. ज्या शाळांमध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे, तेथे पाणी आणि स्वच्छतेअभावी त्याचा वापर करणे अडचणीचे ठरते. आता शिक्षण विभागाने ४३७ शाळांमध्ये ८४७ नवीन वर्गखोल्या उभारण्यासाठी, तसेच ४० शाळांमध्ये मुलींसाठी शौचालय बांधण्यासाठी निधीची मागणी केली आहे. गळके वर्ग, पिण्यासाठी शुद्ध पाण्याचा अभाव आणि देयके न भरल्यामुळे खंडित होणारा वीजपुरवठा अशा समस्यांच्या विळख्यातही विद्यार्थी शिक्षणाची आस धरून आहेत. त्यांच्याकडून शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी धड रस्ता नसल्याची तक्रार केली जाते.

**ब्रिटिशकालीन खोल्यांमध्ये अध्यापन**

जळगाव जिल्हा परिषदेच्या १,८७३ प्राथमिक शाळांमध्ये पावणेदोन लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या जिल्ह्यातील काही शाळांच्या इमारतींची स्थिती अद्याप चिंताजनक आहे. काही ठिकाणी ब्रिटिशकालीन वर्गखोल्यांमध्ये आजही अध्यापन सुरू आहे. अलीकडेच बांधण्यात आलेल्या काही वर्गखोल्यांचीही दुरुस्तीअभावी पडझड सुरू झाली आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील १,८०० हून अधिक शाळांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, काही शाळा अद्याप या सुविधेपासून वंचित आहेत. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत वाईट आहे. पाणी नाही, नियमित स्वच्छता नाही, दरवाजे आणि अन्य साहित्याची दुरवस्था यामुळे स्वच्छतागृहे वापरण्यायोग्य नाहीत. काही शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नाही. पोषण आहार तयार करण्यासाठी बाहेरून पाणी आणावे लागते. पाण्याअभावी स्वच्छतेबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण होत आहे.

**३९७ वर्गखोल्यांची पडझड**

नंदुरबार जिल्हा परिषद शाळांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. सद्य:स्थितीत ४७ शाळांना स्वतंत्र इमारती नाहीत. त्यामुळे काही शाळा भाडेतत्त्वावरील जागेत, तर काही ठिकाणी खुल्या आकाशाखाली भरतात. तब्बल ३९७ वर्गखोल्यांची पडझड झाली आहे. आदिवासी उपयोजनेत शाळा बांधकाम आणि दुरुस्तीसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष नसल्याने नवीन बांधकाम तसेच दुरुस्तीच्या कामांना अडथळे निर्माण होत आहेत. गेल्या दोन वर्षांत शाळा बांधकाम आणि वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी २६ कोटी रुपयांचा निधी मिळूनही शाळांची अवस्था सुधारलेली नाही. ५२ शाळांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा नाही. तर तब्बल ३५० स्वच्छतागृहे वापरात नाहीत.

**स्वच्छतागृहे दुरुस्तीच्या प्रतीक्षेत**

धुळे जिल्हा परिषदेच्या १,०७७ शाळांपैकी २१ शाळांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा नाही. तब्बल २०३ शाळांमधील स्वच्छतागृहांना दुरुस्तीची गरज आहे. दुरुस्तीअभावी ही स्वच्छतागृहे उपलब्ध असूनही नसल्यासारखीच आहेत. जिल्ह्यातील शाळांमध्ये मुलांसाठी १,०४६, तर मुलींसाठी १,०६२ अशी एकूण २,१०८ स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत.

**पश्चिम महाराष्ट्र: धोकादायक वर्गखोल्या, यंत्रणा ढिम्म**

सोलापूर जिल्ह्यातील एकूण २,७७२ शाळांमधील ११,६०५ वर्गखोल्यांपैकी आतापर्यंत केवळ १,४२१ खोल्यांचेच स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण झाले आहे. तब्बल १,१६९ वर्गखोल्या धोकादायक असल्याचे समोर आले आहे. काही दिवसांपूर्वी अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेच्या छताचा गिलावा पडून १३ विद्यार्थी व २ शिक्षक जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर १५ वर्षांपेक्षा जुन्या सर्व शाळांचे ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, अद्याप ८७ टक्क्यांहून अधिक खोल्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसह इतर प्रशासकीय इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट मान्यताप्राप्त संस्थेकडून करून घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नियुक्तीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. १५ वर्षांपेक्षा जुन्या इमारतींची प्राधान्याने तपासणी होईल असे सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले. पुणे जिल्हा परिषदेच्या ३५४६ शाळा आहेत. या शाळांमध्ये २ लाख ५० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यातील काही शाळांमध्ये छतगळती, खराब फ्लोअरिंग अशा समस्या आहेत. अनेक शाळा ५० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुन्या आहेत. माळवाडी रायरेश्वर येथील प्राथमिक शाळेत तीन-चार वर्गखोल्या आहेत. ही शाळा दुर्गम भागात, डोंगरावर आहे. पावसाचे प्रमाण जास्त असल्याने या शाळेत छतगळतीची समस्या आहे. मात्र, शाळेची पटसंख्या अत्यल्प असल्याने शाळेच्या विद्यार्थ्यांना त्याच परिसरातील मंदिरात बसवण्यात येते. जिल्हा परिषदेने शाळा सुधारणांच्या दृष्टीने गेल्या वर्षीपासून व्यापक काम सुरू केले आहे. त्यानुसार गेल्या वर्षी सर्व शाळांचे स्थापत्य लेखापरीक्षण करून घेण्यात आले. मॉडल स्कूल संकल्पनेअंतर्गत पीएमश्री किंवा सीएमश्रीमध्ये नसलेल्या आणि सर्वांत जास्त सात पटसंख्येच्या ३०३ शाळा गेल्या वर्षी, यंदा ५५० शाळा सुधारण्यात येत आहेत. त्यात पायाभूत सुविधा वर्गखोल्या दुरुस्ती, फ्लोअरिंग, स्वच्छतागृह, सीमाभिंत, प्रयोगशाळा अशा सुविधा निर्माण करण्यात येत आहे. ३० ते ३५ शाळांची इमारती पाडून नवीन बांधण्यात आल्या. गेल्या वर्षी डीपीडीसी, सेस, सीएसआरद्वारे ४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी खर्च करण्यात आला. आता ३०० गरजू शाळांसाठी 'मिशन ३०० : जुनी शाळा, नवी ओळख' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमातून शाळांचे छत, फरशी, खिडक्या-दरवाजे, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज, सौरऊर्जा आणि शिक्षणपूरक सुविधा पुरवण्यात येणार आहेत.

---

पान १ व ४ वरुन...

## तुकाराम मुंढेंनी मोर्चा

प्रशासनाने परत एकदा एमआयडीसी आणि मोंढा चाळून काढावा अशी मागणी करण्यात येत आहे.

तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासनाकडून भेसळ रोखण्यासाठी कारवाईची मोहीम उघडली आहे. विविध हॉटेल व्यावसायिकांवर कारवाई केल्यानंतर आता तेलाकडे मोर्चा वळवण्यात आला. सोयाबीन तेलामध्ये भेसळीच्या संशयावरून अकोल्यात दोन कारखान्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली. यावेळी एकूण ११.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही कारखान्यांचे परवाने निलंबित करण्यात आले. या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली. सणासुदीच्या तोंडावर तेलाच्या मागणीत वाढ होते. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात भेसळ होते. भेसळयुक्त तेल आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरते. तेलातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तपासणीची विशेष मोहीम सुरू केली. यामध्ये शहरातील औद्योगिक वसाहत परिसरात दोन कारखान्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. यात तेलाचा साठा जप्त केला. पण हे फक्त आकोल्यातच नसून पूर्ण राज्यात तेलात भेसळ चालते यात बीड जिल्हा कदाचित आघाडीवर असावा अशी चर्चा आहे. कारण बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात टँकर भरुन तेल येतो, तो कोठून येतो, त्याची गुणवत्ता काय? याबाबत कसलीही माहिती कोणाला नाही. मागे अन्नभेसळ अधिकाऱ्यांनी कारवाई केली होती त्यांनाही देण्यात आली नव्हती, यामुळे टँकरमध्ये आलेला तेल लगेच डब्बे अन्? पुड्यात पॅक करुन विक्री केला जातो. पण याकडे अन्न व औषध प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. मागे एक कारवाई केली, बातम्या छापून आणून वहा वहा मिळवली पण त्या कारवाईत पुढे काय झाले, कोणाचे नमुने सदोष निघाले, कोणाचे चांगले, या त्या गोडाऊन आणि मीलचे सील उघडले की, नाही ही कोणतीही माहिती समोर आली नाही. मात्र या व्यापाऱ्यांच्या अधिकाऱ्यांशी बैठका झायाची चर्चा आहे. यामुळे त्या कारवाईत पुलाखालून बरेच तेल वाहून गेल्याचेही सांगितले जात आहे.

## ट्रम्पची खुमखुमी संपेना!

नागरिक मारले गेले आहेत. तसेच अनेक जण जखमीही झाले आहेत. इराणने अमेरिकेला या हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

लारक बेट इराणच्या प्रमुख बंदरगाह बंदर अब्बासजवळ आणि होर्मुझच्या अगदी मध्यभागी स्थित आहे. हा सागरी मार्ग जगासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण युद्धापूर्वी जगामध्ये वापरल्या जाणाऱ्या २०% तेल आणि लिक्विफाइड नॅचरल गॅसची वाहतूक याच मार्गाने होत होती. अहवालानुसार, इराण सध्या या बेटाजवळून जाणाऱ्या टँकरची तपासणी करत आहे. तसेच जहाजांकडून सामुद्रधुनी पार करण्यासाठी २० लाख डॉलर म्हणजेच सुमारे १९ कोटी रुपयांपर्यंत कर वसूल करत आहे.

## एमबीबीएस-बीडीएस

शासनाने ६ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र देण्याची सवलत दिली आहे. मी २ जुलैला जात वैधतेसाठी अर्ज केला. काही दिवसांत मला प्रमाणपत्र मिळेलच. पण मी आता स्पर्धेबाहेर गेलो.'

**मी राज्याबाहेरची कशी, नित्या ठेंगरे हिचा सवाल**

गारखेड्याच्या शिवाजीनगरातील नित्या ठेंगरे ही मराठा समाजाची विद्यार्थिनी आहे. तिला 'एसईबीसी'तून एमबीबीएस सीट हवी होती. तिचा ऑल इंडिया रँक ६८,४७७ आहे. पण रविवारच्या यादीत तिचे नावच नाही. नित्या म्हणते, 'मी शहरात राहते तरीही सीईटी सेलने महाराष्ट्राबाहेरची घोषित केले..? येथील कक्षात दाद न मिळाल्याने सोमवारी मुंबईच्या सीईटी सेलमध्ये जाणार आहे.'

**ओपन ठरवून अन्याय का केला : यश खारुळे**

यश खारुळे हा शहरातील नारेगाव (संभाजीनगर) येथील विद्यार्थी. त्याला एससी प्रवर्गातून प्रवेश हवा होता. त्याचा ऑल इंडिया रँक ७,१४,३३४ आहे. तर स्टेटमध्ये एससीमधून ३७९७ आहे. त्याचा प्रवेश बीएएमएसमध्ये होऊ शकतो. सीईटी सेलने 'एससी'मधून 'ओपन' मध्ये टाकले. जात वैधता प्रमाणपत्रासाठी दिलेल्या अर्जाची पावती जोडली तरीही मला ओपन केले आहे.'

## पक्षाच्या बैठकीला

काही दिवसांपासून रोहित पवार हे त्यांच्या पक्षाच्या बैठकांपासून किंवा धोरणांपासून अंतर राखत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे रोहित पवारांच्या मनात नेमकं काय चाललंय? असे वेगवेगळे सवाल राजकीय वर्तुळातून उपस्थित केले जात आहेत.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी महत्वाचं भाष्य केलं आहे. रोहित पवारांची काँग्रेसशी जवळीक वाढतेय का? या चर्चांवर बोलताना सुप्रिया सुळे यांनी म्हटलं की, 'या वयात अस्वस्थपणा असतोच. पण मी कधीही कोणाला काही सल्ला देत नाही', असं सूचक भाष्य सुप्रिया सुळे यांनी एका मुलाखतीत बोलताना केलं आहे.

पुण्यात आदिवासी विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू आहे, त्या आंदोलनाला रोहित पवारांनी स्वत:च्या पक्षातील नेत्यांना न बोलवता ते थेट राहुल गांधींना आमंत्रित करतात. अजित पवारांचं अपघाती निधन झालं, त्याबाबतही रोहित पवार हे राहुल गांधींना जाऊन भेटले होते. तसेच रोहित पवारांनी जेव्हा शेतकऱ्यांच्या मुद्यांवर पंढरपुरमध्ये आंदोलन केलं, तेव्हा त्यांना भेटायला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ गेले होते. पुण्यात राहुल गांधी यांचा छात्रो की गूंज कार्यक्रम झाला, तेव्हा त्यांच्या स्वागताचे बॅनर्स रोहित पवारांनी लावले होते. त्यामुळे रोहित पवारांची काँग्रेसशी जवळीक वाढतेय का? अशी चर्चा आहे. यावर तुमचं काय मत आहे? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. या प्रश्नावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''आमचा पक्ष किती लोकशाही पद्धतीने चालतो ते पाहा. म्हणजे आमच्या पक्षात किती स्वातंत्र्य दिलं जातं ते बघा. पण असं आहे की एक अस्वस्थपणा हा त्या वयात असतो. एका वयानंतर हळूहळू जबाबदाऱ्या जशा वाढतात तशी मॅच्युरिटी येत असते. रोहित पवार हे तरुण आहेत. मी देखील ४० व्या वर्षी आता रोहित आहे त्यासारखीच होते. आता संसदेत माझ्यासारखं भाषण कोण करतं? भारतीय जनता पक्षाला राहुल गांधी यांच्याबरोबरीने सर्वात जास्त अंगावर कुठला पक्ष घेतो?'', असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

**रोहित पवारांना काय सल्ला द्याल?**

आमदार रोहित पवार यांना काय सल्ला द्याल? असा प्रश्न विचारण्यात आला असता, यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''मी कधीही कोणाला सल्ला देत नाही. पक्षाच्या नेत्या म्हणून देखील मी कोणाला काही सल्ला देत नाही. असं आहे की वडिलांचे काहीतरी गुण आले पाहिजेत. आयुष्यात सर्वच काही बोलायचं नसतं. थोडं हात राखून पण ठेवायचं असतं'', असं सूचक भाष्य सुप्रिया सुळे यांनी केलं.

## जरांगेंच्या विरोधानंतरही

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या तीव्र विरोधानंतरही परभणीत शिवसेनेच्या युवा संवाद व शेतकरी मेळावा पार पडला. जरांगे यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. मराठा आरक्षण देताना इतर आरक्षणाला धक्का न लावता मार्ग काढला जाईल, असे आश्वासन या मेळाव्यात शिंदे यांनी दिले. त्यांनी शेतकऱ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची माहितीही दिली. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जात आहे. कृषी अवजारे, वीज बिलात सवलत, सौर कृषी पंपांचा विस्तार या योजनांना मराठवाड्यात प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सरकारच्या शिष्टमंडळासोबत माझी कोणतीही बोलणी झालेली नाही. मी कोणाचीही वाट पाहत नाही. आता सरकारला वेळ वाढवून मिळणार नाही. मराठा समाजाला मुंबईत जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

**आंदोलनाबाबत चर्चेची दारे खुली : मुख्यमंत्री**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर यापूर्वीही आपण चर्चेतून मार्ग काढला आहे. भविष्यातही यातून नक्कीच सकारात्मक मार्ग काढणार आहोत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात बोलताना दिली. ते म्हणाले की कायदेशीरदृष्ट्या सर्व रास्त व योग्य मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारची चर्चेची दारे कायम खुली आहेत.

**जरांगेंनी खडसावले, जाधवांची सभेत माफी**

जरांगे यांनी खासदार संजय जाधव यांना फोन करून कार्यक्रम रद्द करण्याची ताकीद दिली होती. त्यानंतर शिंदे सेनेचे बच्चू कडू यांनी फोनवरून जरांगेंची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तर, १५ दिवसांपासून तयारी सुरू होती. ऐनवेळी कार्यक्रम रद्द केला असता तर शेतकऱ्यांनी मला मारले असते, अशा धर्मसंकटात मी सापडलो होतो, असे सांगत खा. जाधव यांनी मेळाव्यात जरांगेंची जाहीर माफी मागितली.

## आदित्य नागरगोजे झाला

अत्यंत कठीण मानली जाणारी परीक्षा दिली. या परीक्षेत त्यांनी अखिल भारतीय स्तरावर २८१वा क्रमांक मिळविला. लेखी परीक्षेतील यशानंतर मुलाखतीच्या पुढील निवड प्रक्रियेलाही त्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जात आपली गुणवत्ता सिद्ध केली.

अखेर १४ ऑगस्ट २०२६ रोजी इस्रोकडून नियुक्तीचे अधिकृत पत्र त्यांना प्राप्त झाले आणि वैज्ञानिक होण्याचे त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. इतर ठिकाणी उपलब्ध असलेल्या संधींचा विचार न करता केवळ इस्रोमध्ये वैज्ञानिक म्हणून काम करण्याचे ध्येय त्यांनी जपले. आता १ सप्टेंबर २०२६ रोजी ते इस्रोमध्ये रुजू होणार असून, देशाच्या अंतराळ संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रात त्यांच्या योगदानाची नवी सुरुवात होणार आहे.

**दीड एकर शेतीतून उंच भरारी**

अल्पभूधारक कुटुंबातून आलेल्या आदित्य यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचे संस्कार, प्रोत्साहन आणि त्यागाचा मोठा वाटा आहे. त्यांचे वडील अशोक नागरगोजे यांच्याकडे अवघी दीड एकर शेती असून त्यांनी सहकार क्षेत्रात लेखापरीक्षक म्हणून सेवा बजावली आहे. सेवानिवृत्तीनंतरही मुलाच्या शिक्षणासाठी आणि त्याच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठबळ दिले.

आई जयश्री नागरगोजे आणि वडील अशोक नागरगोजे यांनी लहानपणापासूनच आदित्य यांच्यातील वेगळे गुण ओळखले होते. आपला मुलगा भविष्यात निश्चितच वेगळे अस्तित्व निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी ठेवला. आदित्य यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमातून हा विश्वास सार्थ ठरविला आहे.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ठरला प्रेरणादायी आदर्श**

चांद्रयान, मंगळयान, आदित्य-एल१ आणि गगनयान यांसारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांमुळे जगभर भारताचा गौरव वाढविणाऱ्या इस्रोमध्ये काम करण्याची संधी आदित्य यांना मिळणे ही तागडगावसह संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला दोष न देता मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने मेहनत घ्यावी, असा प्रेरणादायी संदेश आदित्य यांच्या यशातून मिळतो. ज्ञान, संशोधन आणि नव्या कल्पनांच्या बळावर त्यांनी भविष्यात देशाच्या अंतराळ संशोधन क्षेत्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तागडगाव, शिरूर कासार तालुका आणि बीड जिल्ह्याचा मान उंचावणाऱ्या या कर्तृत्ववान सुपुत्राचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमीच्या

पुन्हा एकदा उज्ज्वल झाले आहे.

**तीन खेळाडूंची पदकांची शानदार कमाई**

अरकाम माजेद शेख, समर्थ अंकुश मुजमुले आणि जैद सरताज सय्यद या तीन खेळाडूंनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. काता आणि कुमिते प्रकारातील सामन्यांमध्ये त्यांनी प्रभावी खेळ करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि पदकांवर आपले नाव कोरले.

या यशामागे खेळाडूंची सातत्यपूर्ण मेहनत, नियमित सराव, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा मोठा वाटा आहे. स्पर्धेपूर्वी केलेल्या कठोर सरावाचा फायदा खेळाडूंना सामन्यांमध्ये झाला. प्रशिक्षकांनी दिलेल्या तांत्रिक मार्गदर्शनाचा योग्य वापर करत खेळाडूंनी दबावाच्या परिस्थितीतही संयम राखत आपली कामगिरी उंचावली.

**रेंशी माजेद शेख यांचे मार्गदर्शन ठरले मोलाचे**

या उल्लेखनीय यशामध्ये सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमीचे प्रशिक्षक व मार्गदर्शक रेंशी माजेद शेख सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंना नियमित प्रशिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास, शिस्त, चिकाटी आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत या यशातून अधोरेखित झाली आहे. कराटे हा केवळ पदक मिळविण्याचा खेळ नसून आत्मसंरक्षण, शिस्त आणि मानसिक कणखरता विकसित करणारे प्रभावी माध्यम आहे. या दृष्टिकोनातून अकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंना सातत्याने प्रशिक्षण दिले जात असून, त्याचा सकारात्मक परिणाम विविध स्पर्धांमधील कामगिरीतून दिसून येत आहे.

**माजलगावच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण**

आंतरराष्ट्रीय ओपन कराटे स्पर्धेत ३ सुवर्ण आणि ३ रौप्यपदकांची कमाई ही माजलगावच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. या यशामुळे शहरातील युवा खेळाडूंनाही विविध क्रीडा प्रकारांत पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अरकाम माजेद शेख, समर्थ अंकुश मुजमुले आणि जैद सरताज सय्यद या तिन्ही खेळाडूंचे तसेच त्यांचे प्रशिक्षक रेंशी माजेद शेख, पालक आणि सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर माजलगावचा झेंडा आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणाऱ्या या युवा खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी क्रीडाप्रेमी, पालकवर्ग आणि माजलगावकरांकडून हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## पाथरी तालुक्यात पावसाने

शेतकऱ्यांना मदत व सवलती मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत पाऊस झाला नाही तर पाथरी तालुक्यातील खरीप हंगामाची परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाकडून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## मानवी हक्क अभियानच्या धारूर

काळापासून मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करत असून, संघटनेच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची तसेच संघटनेप्रती असलेल्या एकनिष्ठतेची दखल घेत त्यांच्यावर धारूर तालुका सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यावेळी मानवी हक्क अभियानचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव उमाप, युवक जिल्हाध्यक्ष बाबासाहेब मुजमुले, दत्ता इचके यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवाजी काळे यांच्या निवडीबद्दल मानवी हक्क अभियानच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या माध्यमातून तालुक्यात संघटनेचे सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## मिल्लीया (मुलींची)

मसरत जहाँ कादरी (बी.एच.एम.एस., सी.जी.ओ., सी.सी.एच.), स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञ; तसेच श्रीमती डॉ. आफरीन मिर्झा (बी.ए.एम.एस.), स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञ, आयकॉन क्लिनिक, करंजा खंदक, बीड या मोफत आरोग्य सेवा देणार आहेत.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी फैसल सर, शिक्षिका हाजरा बाजी, सबीया खतीब बाजी, मसरत सुलताना बाजी, नीशात बाजी, नजमुसहेर बाजी, शाजीया खान बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी आणि अदीबा बाजी विशेष परिश्रम घेत आहेत. भालदारपुरा तसेच संपूर्ण बीड शहरातील माता, भगिनी, विद्यार्थी व नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, तसेच आपल्या आरोग्याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन शाळा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिराची वेळ : सकाळी १० ते दुपारी १, दिनांक : १ सप्टेंबर २०२६, स्थळ : मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलींची), शाखा-भालदारपुरा, बीड

## चौसाळ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

आहे. त्याच्या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि परिसरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द आणि सातत्य ठेवले तर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे कैफ शेखचे यश प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

कैफ शेख याने भविष्यात यशस्वी डॉक्टर होऊन समाजाची सेवा करावी, यासाठी त्याला सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.कैफ शेखच्या या यशाबद्दल त्याचे वडील शेख जलील व कुटुंबीयांचे मनःपूर्वक अभिनंदन यावेळी कैफचा सत्कार करण्यात आला यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक,शिक्षक वर्ग,पत्रकार बांधव व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सय्यद गुरुजी साहित्य

शिक्षक दिनाच्या निमित्ताने ५१ पुस्तकांची पेटी भेट देण्यात येणार आहे.असे सय्यद गुरुजींचे चिरंजीव कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी सांगितले.सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत सय्यद गुरुजी यांनी सन १९५७ ते पुढे अकरा वर्ष शिक्षक,मुख्याध्यापक म्हणून सेवा केली.येथील पंचक्रोशीतील त्यांचे अनेक विद्यार्थी आजही त्यांच्या आठवणी जागवतात.बीड जिल्ह्याचे तत्कालीन खासदार क्रांतिसिंह नाना पाटील हे सुलेमान देवळा येथे शाळा इमारतीच्या उद्घाटनासाठी आले असता सय्यद गुरुजी यांनी त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले होते.शिक्षक दिनी सय्यद गुरुजी साहित्य अकादमी तर्फे पुस्तक भेट कार्यक्रमाला मुख्याध्यापक,सर्व शिक्षक वृंद,पोलीस पाटील, सरपंच,उपसरपंच,सर्व सदस्य,ग्रामस्थ,शेतकरी उपस्थित राहणार आहेत असे साहित्यिक,कवी वि.भा.साळुंके यांनी सांगितले.

## अर्ज, निवेदन देऊनही महावितरणची

लगड यांच्यासह संबंधित शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयाकडे लेखी अर्ज व निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. मात्र, वारंवार तक्रारी करूनही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.वीजपुरवठा खंडित होत असल्याने कृषी पंपांवर परिणाम होऊन पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तेलगाव-बीड रोडवरील डीपीजवळील जीर्ण विद्युतपोलही धोकादायक अवस्थेत असून, तो कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलणे, ३३ केव्ही लाईनची समस्या कायमस्वरूपी सोडवणे आणि धोकादायक पोल व वीजवाहिन्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकरी व नागरिकांनी दिला आहे.

## नगर-बीड डेमूचा प्रवास

सामान्य प्रवाशांची मोठी वेळेची बचत होणार आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, गाडी क्रमांक ७१४४१ अहिल्यानगर बीड डेमू सेवा १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर स्थानकावरून सकाळी ६:५५ ऐवजी ५० मिनिटे उशिरा, म्हणजेच सकाळी ७:४५ वाजता सुटेल. मात्र, वेगात वाढ केल्यामुळे ही गाडी बीड येथे पूर्वीच्या दुपारी १२:३० ऐवजी खूप आधी, म्हणजेच सकाळी ११:४५ वाजताच पोहोचेल. परतीच्या प्रवासात, गाडी क्रमांक ७१४४२ बीड अहिल्यानगर डेमू सेवा बीड स्थानकावरून दुपारी १:०० ऐवजी एक तास आधी, म्हणजेच दुपारी १२:०० वाजता प्रस्थान करेल. ही गाडी अहिल्यानगर येथे जुन्या वेळेनुसार सायंकाळी ६:३० ऐवजी तब्बल अडीच तास आधी, म्हणजेच दुपारी ४:०० वाजता पोहोचेल.

**असे आहेत रेल्वेथांबा**

या दोन्ही गाड्यांच्या प्रवासादरम्यान अहिल्यानगर, नारायणदोहो, न्यू लोणी, सोलापूरवाडी, न्यू धानोरा, कडा, न्यू आष्टी, वेताळवाडी, हाटोला, अमळनेर भांड्याचे, जटनानदूर, विघनवाडी, रायमोहा, राजुरी आणि बीड या सर्व प्रमुख स्थानकांवर नेहमीप्रमाणे थांबे कायम राहणार आहेत.

**रेल्वे विभागाचे अवाहन**

दरम्यान, मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, त्यांनी या नव्या आणि सुधारित वेळापत्रकाची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि त्यानुसारच आपल्या प्रवासाचे नियोजन करावे. मार्गावरील सर्व मध्यवर्ती थांबा स्थानकांवरील गाड्यांच्या आगमनाची व प्रस्थानाची अचूक वेळ तपासण्यासाठी प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी भारतीय रेल्वेच्या .... या चौकशी पोर्टलला भेट द्यावी किंवा मोबाईलमधील अधिकृत ॲपचा वापर करावा, असे रेल्वेच्या जनसंपर्क विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## वाढदिवसाला माजलगावात

अथवा दहशत निर्माण होईल, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल किंवा सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल, असे कोणतेही कृत्य करू नये, अशी सक्त ताकीद पोलिसांनी दिली. दरम्यान, समाजमाध्यमांवर प्रसिद्धी मिळविण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी कायदा व सुव्यवस्था बिघडेल, असे कृत्य करणाऱ्यांवर परिस्थितीनुसार प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बीड जिल्हा पोलिसांनी दिला आहे. नागरिकांनी अशा घटनांचे व्हिडिओ अथवा माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास कळवावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने

देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, सभापती राम शिंदे, नादिर गोदरेज, भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला, पंचशील ग्रुपचे संस्थापक व अध्यक्ष अतुल चोरडिया, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पुरस्कारार्थी उपस्थित होते.

ACC AVISHKAR
Coaching Classes
10th Summer+Regular+ Special NTSE Batch — With Pre NEET/JEE Foundation
9th Basic Foundation +Regular — With Pre NEET/JEE Foundation
8th Scholarship+Basic Foundation +Regular — With Pre NEET/JEE Foundation
7th Basic Batch+Regular
6th Basic Batch+Regular
5th Scholarship+ Navodaya +Regular
Medium: SEMI, CBSE, ICSE
Subjects: English, Mathematics, Science, Sanskrit
Contact: 7722080501, 7722080503

# पोलीस पाटलांच्या प्रत्येक अडचणीत सक्षमपणे पाठीशी उभा राहणार-आ.सोळंके

## माजलगाव उपविभागाची पोलीस पाटील कार्यशाळा व मेळावा संपन्न

**धारूर | सत्यवादी**

धारूर तालुक्यातील तेलगाव येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयात माजलगाव उपविभागातील पोलीस पाटलांची कार्यशाळा व मेळावा उत्साहात संपन्न झाला. माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास पोलीस पाटील गावकामगार संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील, धारूरचे तहसीलदार श्रीकांत निळे, धारूरचे पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे, माजलगावचे पोलीस निरीक्षक विजयकुमार रामोड, दिंद्रुडचे सहायक पोलीस निरीक्षक महेश भोसले, संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष श्रीकृष्ण साळुंखे, नांदेड जिल्हाध्यक्ष भास्करराव कंकाल पाटील, बीड जिल्हाध्यक्ष सुधाकर गाडे यांच्यासह उपविभागातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर धारूर तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष सचिन थोरात पाटील यांनी प्रास्ताविकातून ग्रामस्तरावर काम करताना पोलीस पाटलांना येणाऱ्या विविध मूलभूत अडचणी व प्रश्नांची मुद्देसूद मांडणी केली. बीड जिल्ह्यात वशिल्याविना आणि पारदर्शक पद्धतीने पोलीस पाटील भरती प्रक्रिया पार पडल्याबद्दल त्यांनी शासन व प्रशासनाचे आभार मानले. तसेच पोलीस पाटलांच्या ३० हजार रुपये मानधनाचा प्रश्न आमदार प्रकाश सोळंके यांनी मार्गी लावावा, असा आग्रह करत तो प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वासही व्यक्त केला.

यानंतर माजलगाव तालुकाध्यक्ष तानाजी गिलबिले पाटील यांनी पोलीस पाटलांच्या विविध मागण्या व अडचणींकडे उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधले.

**पोलीस पाटील उच्चशिक्षित, कामाप्रती तळमळीने कार्यरत : तहसीलदार निळे**

धारूरचे तहसीलदार श्रीकांत निळे यांनी मार्गदर्शन करताना प्रत्येक गावातील पोलीस पाटील उच्चशिक्षित असून कामाप्रती तळमळ ठेवून पारदर्शकपणे काम करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. धारूरचे पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे यांनीही पोलीस पाटलांच्या कार्याचे कौतुक केले. माजलगावचे पोलीस निरीक्षक विजयकुमार रामोड यांनी पोलीस पाटील तरुण असून त्यांच्यामध्ये काम करण्याची मोठी इच्छाशक्ती असल्याचे सांगितले. केवळ पोलीस पाटील पदावर समाधानी न राहता उच्चशिक्षित पोलीस पाटलांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी केले. दिंद्रुडचे सहायक पोलीस निरीक्षक महेश भोसले यांनी ग्रामस्तरावरील बदलत्या वादांच्या स्वरूपावर भाष्य केले. पूर्वी शेतीचे बांध, भावकीचे वाद यांसारख्या कारणांवरून वाद होत असत; मात्र आता मोबाईल आणि सोशल मीडियामुळे नवीन स्वरूपाचे वाद निर्माण होत आहेत. त्यामुळे गावातील घडामोडींवर तसेच सोशल मीडियावरील हालचालींवर पोलीस पाटलांनी लक्ष ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

**पोलीस पाटलांच्या प्रत्येक अडचणीत ठामपणे पाठीशी : आ. सोळंके**

अध्यक्षीय भाषणात आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, बीड जिल्ह्यात निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने पोलीस पाटील भरती प्रक्रिया व्हावी, यासाठी आम्ही आग्रही होतो. ही भरती प्रक्रिया निष्पक्षपणे पार पडल्याचा आनंद आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, बळीराजा पांदण रस्ते यांसारख्या विषयांवर वाद निर्माण होण्यापूर्वीच तो मिटवण्यासाठी संबंधित समित्यांमध्ये पोलीस पाटलांचा सहभाग असणे आवश्यक आहे. पोलीस पाटील हे ग्रामस्तरावर कार्यरत असल्याने त्यांचा सहभाग



व अनुभव वाद टाळण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागात शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटीव्हीचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. गावात पत्त्यांचा जुगार, अवैध दारू, गुटखा, मटका यांसारखे अवैध प्रकार सुरू असल्यास पोलीस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस पाटलांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. ''माझ्या उपविभागातील कोणत्याही पोलीस पाटलाला अडचण आली किंवा संकट निर्माण झाले, तर त्यांच्या पाठीशी मी सक्षमपणे आणि ठामपणे उभा राहीन,'' अशी ग्वाही आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस पाटील संघटनेच्या मागणीनुसार माजलगाव येथे पोलीस पाटील भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड!



## चक्क स्प्रिंकलरचा घेतला आधार!

**सेनगाव | सत्यवादी**

या वर्षाच्या हंगामात सुरुवातीला पावसाने समाधानकारक हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या केल्या. मात्र,पिके बहरत असतानाच पावसाने दडी मारल्याने कडक ऊन आणि जमिनीतील ओलावा संपल्याने सोयाबीन, कपाशी आणि इतर पिके सुकु लागल्याने सेनगाव तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यांदेखत जळून खाक होण्याची भीती निर्माण झाल्याने आता पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धडपड सुरू झाली आहे. ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची उपलब्धता आहे अशा शेतकऱ्यांनी पिके जगवण्यासाठी चक्क स्प्रिंकलर तुषार सिंचनाचा आधार घेतला असल्याचे चित्र सेनगाव तालुक्यातील आजेगाव शिवारात पाहायला मिळत आहे. यावर्षी पावसाच्या अनियमितेमुळे जमिनीतील पाण्याची पातळी खालावली आहे. विहिरी बोअरवेल कोरडेठाक होण्याच्या मार्गावर आहेत. अश्यातच पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. पाणी वाया जाऊ नये आणि कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त क्षेत्रातील पिके जगवता यावीत, यासाठी आजेगाव सह विविध परीसरात स्प्रिंकलरचा वापर करून पिकांना संजीवनी देण्यासाठी शेतकरी रात्री-अपरात्री वीज येईल तेव्हा शेतात थांबून,पिकांना पाणी देत पिके वाचवण्यासाठी मोठी धडपड करीत आहे. मात्र ज्या गरीब आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे तुषार सिंचनाची कोणतीही सोय नाही अशा शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले असून त्यांच्या चिंतेत अधिकच भर पडत आहे.

**कमी पाण्यात पिकांना जीवदान**

तुषार सिंचनामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब पिकांच्या मुळाशी आणि पानांवर पडत असल्याने पिकांना तात्पुरता का होईना, मोठा दिलासा मिळत आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, कपाशी, आणि इतर नगदी पिके जी पाण्याच्या अभावी कोमेजून चालली आहे.त्या पिकांना स्प्रिंकलरच्या प्रयोगामुळे एक प्रकारे संजीवनी मिळत आहे. मात्र, वीज पुरवठ्याचा लपंडावामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकच भर पडत आहे.

# जोपर्यंत वस्ती शाळा शिक्षकांची जुनी पेन्शन मिळत नाही एक ही सत्कार घेणार नाही-गेंड सर




**बीड | सत्यवादी**

आज आपण पहात आहोत की, मोबाईल टिचर, विशेष शिक्षक,गट साधन व्यक्ती यांनी शिक्षक आमदार कपिल भाऊ पाटील यांच्या माध्यमातून लोकशाहीतील लढा पाहीला आज ते कायम झाले असाच आता लढा उर्वरित जुनी पेन्शन मिळावी म्हणून शिक्षक दिनी आम्ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काळ्या फिती लावून कामकाज सुरू ठेवणार आहोत, परंतु त्या दिवशी दहीहंडी उत्सव होत असताना काही जिल्ह्यांमध्ये रक्षाबंधन मध्ये सुट्टी घेतली होती,त्या सुट्टी चा विचार न करता येत्या शिक्षक दिनी आपण काळ्या फिती लावून शैक्षणिक कामकाज करणार आहोत, तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी गांधी जयंती दिनी आझाद मैदान ते ऑगस्ट क्रांती मैदान हा सुमारे साडे चार किलो मीटर चा आम्ही प्रवास घडवून एक नवा इतिहास शिक्षक आमदार कपिल भाऊ पाटील यांच्या माध्यमातून घडणार आहे आणि ते घडवणारे आमचे हजारो शिक्षक भारतीचे शिलेदार आणि भगिणी असतील, पण जो पर्यंत जूनी सेवा जोडली जाणार नाही..तो पर्यंत..एकही सत्कार घेणार नाही,असी भिष्म प्रतिज्ञा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारतीचे राज्य अध्यक्ष नवनाथजी गेंड सर यांनी बीड जिल्हा संपर्क दौर्यात केली असून या त्यागा साठी संपूर्ण वस्ती शाळा शिक्षक बंधू भगिनींनी कंबर कसली असल्याचे शैक्षणिक चित्र पहावयास मिळत आहे.

मौजे पाली तालुका बीड या ठिकाणी शिक्षक भारतीचे राज्य सहचरचिटणीस जानकी राम घाडगे, शिक्षक भारतीचे शिलेदार, नवले सर आणि इतर बांधवांच्या माध्यमातून मध्यवर्ती ठिकाण पाली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली या ठिकाणी सहविचार सभा आयोजित केली होती, याबाबत पुढे बोलताना, राज्य अध्यक्ष नवनाथ जी गेंड सर यांनी सांगितले की आपला लढा हा अत्यंत महत्त्वाचा आहे आपण इथवर आलो तर ते फक्त संघर्षाच्या जोरावर, तसेच संविधानाच्या संविधानिक नियमांच्या आधारे आपण लोकशाही मार्गाने जे काही आंदोलन केलेले आहे, आज पर्यंत आपण महाराष्ट्र राज्य पातळीवर सुमारे ३३ लोकशाही मार्गाने आंदोलन केलेले आहेत त्यामध्ये ठाणे ते मुंबई पायी मोर्चा, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावरील मोर्चा, बेमुदत आमरण उपोषण, आदी आंदोलनाची पार्श्वभूमी लक्षात घेता, तत्कालीन सरकारने आम्हाला सुमारे १४ वर्षाचा वनवास आमच्या पदरी बांधला होता, टीईटी सारखी जाच अट, उत्तर प्रदेशमधील शिक्षा मित्र नावाचे सुमारे दोन लाख, शिक्षा मित्र यांना सेवेतून बडतर्फ करणे, मानधनावर काम करण्यासाठी तयार करणे, लोकशाही मधील अत्यंत घातक परिस्थिती आहे. त्यासाठी आपण शिक्षक दिनी ५ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून आपले दैनंदिन कामकाज करणारा आहोत, त्यामध्ये आपली शिक्षक भारतीच नव्हे तर लाख व कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार आहेत, फक्त शिक्षकच नाही तर ज्यांना ज्यांना जुनी पेन्शन पाहिजे आहे त्या त्या विभागातील सर्व कर्मचारी शिक्षक आमदार कपिल भाऊ पाटील यांच्या आवाहनानुसार या आंदोलनामध्ये सहभागी होणार आहेत, तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने आम्हाला खऱ्या अर्थाने जुनी पेन्शन भेटत नाही.

# युवा महोत्सवातून मिळणारी ऊर्जा विद्यार्थिनींच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरेल-डॉ.नांदवडेकर

### एसएनडीटी विद्यापीठाच्या उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सवाचे शानदार उद्घाटन

**बीड | सत्यवादी**

युवा महोत्सव हा विद्यार्थिनींना आपली कला, कौशल्य आणि प्रतिभा सादर करण्याची उत्तम संधी उपलब्ध करून देतो. या महोत्सवात सहभागी होऊन विद्यार्थिनी विविध कला प्रकारांचे सादरीकरण करणार आहेत. या सादरीकरणातून मिळणारी ऊर्जा, आत्मविश्वास आणि अनुभव त्यांच्या पुढील आयुष्यात निश्चितच उपयोगी ठरेल, असा ठाम विश्वास एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केला.




एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सव २०२६चा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, ३० ऑगस्ट रोजी शाहूनगर येथील रामकृष्ण लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

महोत्सवाच्या प्रारंभी बीड शहरातून भव्य व नेत्रदीपक सांस्कृतिक शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातून आलेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि आकर्षक चित्ररथांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. विविध संस्कृतींचा मिलाफ असलेल्या या शोभायात्रेने सर्व बीडकरांचे लक्ष वेधून घेतले. शोभायात्रेनंतर रामकृष्ण लॉन्स येथे मुख्य उद्घाटन सोहळा पार पडला. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख प्रो. डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते युवा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नितीन एस. प्रभुतेंडोलकर, डॉ. साईनाथ बनसोडे, प्रा. सुनील मगरे, प्रो.डॉ.भगवानसिंग डोभाळ प्रा. प्रदीप रोडे, किरण गायकवाड, अँड. सुभाष राऊत, आणि दीपा रोडे, जयंत करपे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना तुलसी कॉलेजचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांनी युवा महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका आणि उद्देश स्पष्ट केला. संस्थेच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी उपस्थित मान्यवरांचे व सहभागी विद्यार्थिनींचे स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा महोत्सवाच्या संयोजिका प्रा. विद्या अवघडे यांनी केले. उद्घाटन सोहळ्यानंतर विविध सांस्कृतिक आणि कला प्रकारांच्या स्पर्धांना उत्साहात सुरुवात झाली. दोन दिवसीय या महोत्सवात विविध कला प्रकारांमध्ये विद्यार्थिनी आपली कलात्मकता आणि कौशल्य सादर करणार आहेत. महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे.

# सामाजिक कार्यकर्ते पोपट तोंडे माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती

**धारूर | सत्यवादी**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असलेले सोनीमोहा येथील युवा कार्यकर्ते कृष्णा ऊर्फ पोपट तोंडे यांची शासनाच्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर येथे माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सोनीमोहासह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



कृष्णा ऊर्फ पोपट तोंडे यांनी सामाजिक कार्यासोबतच शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने योगदान देत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून, युवकांना मार्गदर्शन व समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. राजकीय व धार्मिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असून, त्यांच्या मनमिळावू आणि सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या स्वभावामुळे ते परिसरात परिचित आहेत.

अनेक अडचणींना सामोरे जात संघर्ष, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि सोनीमोहा गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. कृष्णा तोंडे यांच्या यशाकडे गावातील युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण म्हणून पाहिले जात आहे

## राखी पौर्णिमाच्या निमित्ताने राज्य राखीव दलाशी जुळले बंधुत्वाचे नाते

# विद्यावर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थिनींकडून जवानांना राखी ;स्वसंरक्षणाचे धडेही घेतले



**परळी | सत्यवादी**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यावर्धिनी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी राज्य राखीव दल (एसआरपी) हिंगोली येथे भेट देत जवानांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमातून विद्यार्थिनींना देशसेवा, शिस्त आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले.

यावेळी विद्यार्थिनींनी राज्य राखीव दलातील जवानांना राखी बांधून त्यांच्याप्रती आदर आणि आपुलकी व्यक्त केली. जवानांनीही विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच विविध प्रात्यक्षिकांद्वारे सुरक्षादलाचे कार्य, शिस्तबद्ध जीवनशैली आणि संकटसमयी करावयाची कृती याविषयी मार्गदर्शन केले. मुलींनी स्वतःचे संरक्षण कसे करावे, यासंदर्भातही जवानांनी स्वसंरक्षणाची प्रात्यक्षिके सादर केली. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींना जवानांच्या कार्याबद्दल अधिक आदर निर्माण झाला. विद्यावर्धिनी विद्यालयातर्फे दरवर्षी रक्षाबंधनाच्या निमित्ताने विविध ठिकाणी जाऊन राखी बांधण्याचा उपक्रम राबविण्यात येतो. यापूर्वी यमगरवाडी (जि. उस्मानाबाद), मिलिटरी कॅम्प (नगर) तसेच सीआरपी कॅम्प (चाकूर) येथेही विद्यार्थिनींनी जवानांना राखी बांधून सण साजरा केला आहे. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक नीला सर यांच्या मार्गदर्शनाखाली जोशी मॅडम, गायकवाड मॅडम, मुंडे मॅडम, शेटे मॅडम तसेच हंगे सर, सूर्यवंशी सर, राजू मुंडे सर आणि सर्व शिक्षकांनी विशेष सहकार्य केले.

# लेक्रॉसच्या जिल्हास्तरीय स्पर्धा व निवड चाचणीचे आयोजन

**बीड | सत्यवादी**

बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय स्पर्धा व जिल्हा संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.ले क्रॉस हा खेळ तीन प्रकारांमध्ये खेळला जातो त्यापैकी बॉक्स या प्रकाराच्या जिल्हास्तरीय स्पर्धा कालिका नगर येथील मैदानावर दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी घेतल्या जाणार आहेत.

या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेणारे खेळाडू जिल्हा संघटने कडे नाव नोंदणी करून स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवू शकता. या जिल्हास्तरीय बॉक्स लेक्रॉस स्पर्धे मधील निवडलेला संघ नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. अधिक माहितीसाठी बीड जिल्हा लेक्रॉस संघटनेचे सचिव रामदास गिरी यांच्याशी संपर्क साधून आपला सहभाग निश्चित करावा. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धा मध्ये सहभागी व्हावे असे जिल्हा संघटनेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# संपूर्ण विश्वाचा निर्माता एकच-प्रा.वाजेद अली खान

**जाफराबाद | सत्यवादी**

संपूर्ण विश्वाची निर्मिती व निर्माता एकच असल्याने अखिल मानव जात एकमेकांचे भाऊ-बहीण आहे. बहिण भावाचे हे पवित्र नाते जपत सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने वागणे हाच खरा धर्म आहे. असे विचार जमात ए इस्लामी हिंदचे नाशिक जिल्हा सचिव प्रा. वाजेद अली खान यांनी व्यक्त केले. टेंभुर्णी येथे स्थानिक जमात ए इस्लामी हिंद तर्फे शनिवारी आयोजित प्रेषित परिचय कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

येथील भाजी मंडी चमन येथे आयोजित या कार्यक्रमात पुढे बोलताना खान म्हणाले की इस्लाम म्हणजे शांती चा मार्ग. पवित्र धर्मग्रंथ कुराण व प्रेषित मुहम्मद (स.)यांच्या जीवनीतून एक आदर्श जीवन प्रणाली संपूर्ण मानव जातीला मिळाली आहे. दिव्य कुराण मध्ये निर्मिती, निर्माता, उद्देश, मार्ग व अंत अशी पाच मुख्य तत्वे सांगितली असून त्या माध्यमातून शैक्षणिक व्यवस्था, नैतिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, न्यायिक व प्रशासकीय व्यवस्था अशी आदर्श जीवन व्यवस्था अखिल मानव जातीला मिळाली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. धर्माच्या नावावर आज माणसा माणसात दरी निर्माण करण्याचे षडयंत्र सुरू आहे. ते सर्वांनी वेळीच ओळखून आपली राष्ट्रीय एकता अबाधित ठेवावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी मंचावर माजी जि.प. सदस्य शालीकराम म्हस्के, रामधन कळंबे, जनार्धन झोरे, पी.जी.तांबेकर, रघुराम उखर्डे, प्रभू वाघमारे, इद्रीस खान, लक्ष्मण शिंदे, फैसल चाऊस, भिकनखा पठाण, दिव्यांग कवी आकाश देशमुख, मुमताज अली पठाण आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मौलाना अशरफ यांच्या कुराण




पठणाने झाली. यावेळी शेख अलताफ व शालेय विद्यार्थी आहिल सिद्दिकी यांनी नात पठण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जमात ये इस्लामी हिंद चे जाफराबाद तालुका अध्यक्ष मुमताज अली पठाण यांनी केले. तर सूत्रसंचालन शिक्षक शेख साबेर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक जमात ए इस्लामी हिंदचे इद्रीस खान, नसीम शेख, फकरू कुरेशी, शेख साबेर, खालिद सिद्दिकी, शकील तडवी, शेख अलताब आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला सर्व धर्मीय समाज बांधवांची मोठी उपस्थिती होती.

# पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे-मंत्री पंकजा मुंडे

## ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्काराने पर्यावरण क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव




**पुणे । सत्यवादी**

भामला फाऊंडेशन आणि पंचशील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'नाला सुशोभीकरण मोहीम' तसेच 'ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन पुणे येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. 'पर्यावरणासाठी थोडे थांबा, विचार करा आणि संवेदनशील बना', असे आवाहन करत छोटे-छोटे बदलच भविष्यात मोठ्या परिवर्तनाची सुरुवात ठरतात, असे प्रतिपादन यावेळी मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.


पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा यावेळी 'ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स' पुरस्काराने गौरव करण्यात आला. यामध्ये पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महेंद्र कल्याणकर, अभिनेते जॅकी श्रॉफ, पूनावाला समूहाचे प्रतिनिधी तसेच गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक तथा गोदरेज अॅग्रोव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष नादिर गोदरेज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता.

यावेळी बोलताना पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. निसर्गाचा अमर्याद वापर आणि त्यातून होणारा ऱ्हास यामुळे विविध नैसर्गिक आपत्तींचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने योगदान

(पान २ वर...)

# आदित्य नागरगोजे झाला इस्त्रोमध्ये वैज्ञानिक

## तागडगावच्या सुपुत्राने बीड जिल्ह्याचा मान उंचावला



**शिरूर । सत्यवादी**

तालुक्यातील तागडगावचे सुपुत्र आदित्य अशोक नागरगोजे यांनी बुद्धिमत्ता, जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर अवघ्या २७व्या वर्षी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या अंतराळ विभागांतर्गत कार्यरत भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो)च्या लिक्विड प्रोपल्शन सिस्टिम्स सेंटर (एलपीएससी), वलियामला, तिरुवनंतपुरम येथे वैज्ञानिक/अभियंता 'एससी' (यांत्रिकी) या पदावर त्यांची निवड झाली आहे.

आदित्य यांच्या या यशामुळे तागडगावसह शिरूर कासार तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील लौकिकातही भर पडली आहे. लहानपणापासूनच अभ्यासू आणि ध्येयवेडे असलेल्या आदित्य यांनी अंतराळ संशोधन क्षेत्रात काम करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. प्राथमिक शिक्षण बीड येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी लातूर येथे पुढील शिक्षण घेतले. त्यानंतर सांगली येथे बी.टेक.ची पदवी संपादन केली. पुढे देशातील प्रतिष्ठित आयआयटी मद्रास येथून त्यांनी एम.टेक.चे उच्च शिक्षण पूर्ण केले.

अभियांत्रिकीच्या शिक्षणादरम्यान संशोधन आणि अंतराळ विज्ञान क्षेत्रात करिअर करण्याचा निर्धार त्यांनी कायम ठेवला. त्यासाठी त्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये

(पान २ वर...)

# चौसाळ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा कैफ शेखची एमबीबीएससाठी निवड



**चौसाळा । सत्यवादी**

जिल्हा परिषद शिक्षक शेख जलील यांचा मुलगा कैफ जलील शेख याने आपल्या मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.कैफ जलील शेख याची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हिंगोली येथे अभ्यासक्रमासाठी पात्रता झाली आहे.कैफने वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेतलेल्या परीक्षेत चांगली कामगिरी करत डॉक्टर होण्याच्या आपल्या स्वप्नाकडे महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.त्याच्या या यशामुळे वडील शेख जलील, आई, भाऊ शेख सोहेल तसेच संपूर्ण कुटुंबीयांमध्ये व चौसाळा शहरात व परिसरात आनंदाचे वातावरण आहे.शिक्षक वडिलांचे मार्गदर्शन,कुटुंबीयांचा पाठिंबा आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर कैफने हे यश मिळवले

(पान २ वर...)

# अर्ज, निवेदन देऊनही महावितरणची दखल नाही ;तेलगावतील शेतकरी संतप्त

## धोकादायक वीजपोल व ३३ केव्ही लाईनच्या समस्येमुळे जीवितास धोका; आंदोलनाचा इशारा

**धारूर । सत्यवादी**

धारूर तालुक्यातील तेलगाव बु. परिसरातील वीजपुरवठ्याच्या समस्यांकडे महावितरण प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी व नागरिकांनी केला आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर वेळेत न बदलणे, ३३ केव्ही वीजवाहिनीची तार डीपीजवळ पडणे तसेच जीर्ण व धोकादायक विद्युतपोलांमुळे जीवितास धोका निर्माण झाला आहे.

या समस्यांबाबत अण्णासाहेब भारत

(पान २ वर...)



# सय्यद गुरुजी साहित्य अकादमीतर्फे शिक्षक दिनी भेट पुस्तकांचे तिसरे वर्ष



**आष्टी । सत्यवादी**

सय्यद अमीनोद्दीन मास्टर उर्फ सय्यद गुरुजी यांच्या नावे सय्यद गुरुजी साहित्य अकादमीच्या वतीने दरवर्षी शिक्षक दिनी एका शाळेला,लहान मुलांना आवडतील अशी ५१ पुस्तकांची भेट देण्याचा संकल्प सन २०२४ पासून सुरू करण्यात आला आहे.सय्यद गुरुजी यांचे मूळ गाव मौजे चिंचाळा.या गावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेपासून याची सुरुवात झाली. आष्टी तालुक्यात सुलेमान देवळा,धामणगाव, हिवरा, मांडवा, बेलगाव, आष्टी या गावी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सय्यद गुरुजी यांनी सेवा केली.आष्टी नंतर यावर्षी सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला

(पान २ वर...)

# सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमीच्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी

## ३ सुवर्णपदके अन् ३ रौप्यपदकांसह माजलगावच्या शिरपेचात मानाचा तुरा

**माजलगाव । सत्यवादी**

औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ओपन कराटे स्पर्धेत सेल्फ डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी, माजलगावच्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याची आणि मेहनतीची छाप पाडत उल्लेखनीय यश संपादन केले. अकॅडमीच्या तीन खेळाडूंनी काता आणि कुमिते या दोन्ही प्रकारांत दमदार प्रदर्शन करत तब्बल ६ पदकांची कमाई केली. यामध्ये ३ सुवर्णपदके आणि ३ रौप्यपदकांचा समावेश आहे.

या स्पर्धेत विविध ठिकाणांहून आलेल्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये माजलगावच्या खेळाडूंनी आत्मविश्वासाने प्रतिस्पर्ध्यांचा सामना करत आपल्या खेळातील अचूकता, वेग, तंत्र आणि शिस्तीचे दर्शन घडविले. त्यांच्या या शानदार कामगिरीमुळे माजलगावच्या क्रीडा क्षेत्राचे नाव

(पान २ वर...)



# मिल्लीया (मुलींची) प्राथमिक शाळेत विद्यार्थी व मातांसाठी आरोग्य तपासणी

**बीड । सत्यवादी**

अंजुमन ईशाात-ए-तालीम, बीड संचलित मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलींची), शाखा-भालदारपुरा येथे विद्यार्थी व त्यांच्या मातांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

अंजुमन ईशात-ए-तालीमच्या सचिव श्रीमती खान सबिहा बेगम साहेबा तसेच मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलींची)च्या मुख्याध्यापिका श्रीमती रिजवाना बेगम कादरी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरात बीड शहरातील सुप्रसिद्ध स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांकडून विद्यार्थी व मातांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना व उपचारांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरात श्रीमती डॉ. रेशमा पठाण (एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.), ज्येष्ठ स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ, सिटी केअर मॅटर्निटी हॉस्पिटल, बीड; श्रीमती डॉ.

(पान २ वर...)

# पाथरी तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने पिके धोक्यात

**सर्वच मंडळांत दुष्काळसदृश्य परिस्थिती**

**पावसाअभावी खरीप पिकांची वाढ खुंटली**



**पाथरी । सत्यवादी**

पाथरी तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. तालुक्यातील सर्वच महसूल मंडळांमध्ये समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले असून अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. काही भागांत पिके कोमेजण्यास सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

तालुक्यात जुलै-ऑगस्टमध्ये अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने पेरणीनंतर पिकांना आवश्यक ओलावा मिळालेला नाही. त्यानंतर काही ठिकाणी झालेल्या तुरळक पावसामुळे पिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला; मात्र त्यानंतर पुन्हा पावसाने दडी मारल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यासह विविध खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके पिवळी पडत आहेत.

पावसाने आणखी ओढ दिल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून शासनाच्या दुष्काळी निकषांनुसार

(पान २ वर...)

# मानवी हक्क अभियानच्या धारूर तालुका सचिवपदी शिवाजी काळे

**धारूर । सत्यवादी**

धारूर तालुक्यातील सगम येथील मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेचे एकनिष्ठ कार्यकर्ते शिवाजी काळे यांची धारूर तालुका सचिवपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष विष्णू मुजमुले यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली.

शिवाजी काळे हे मागील काही

(पान २ वर...)












This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२-१-५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र - ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✲ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**